MHGA030008322022

**<u>कौ.हि.म.सं.अ.मा क्र. २५/२०२२ मधील निशाणी क्र. ०५ वरील आदेश</u>**

(दिनांक २२/१०/२०२४ )

१. अर्जदाराने मुळ अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ अन्वये दाखल केला असून प्रस्तुतचा अर्ज अंतरीम आदेशांकरिता कलम २३ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार व गैरअर्जदार हे दोघेही पती–पत्नी आहेत. अर्जदाराने तिच्या अर्जात घरगुती हिंसाचाराचे विविध आरोप कथन केले आहेत. तिला स्वत:ला सांभाळता येत नसल्याचे तिने सादर केले. अर्जदाराने मुळ अर्जाचा अंतीम निकाल लागेपर्यंत दरम्यानचे काळात गैरअर्जदाराविरूध्द केस दाखल करण्यास, हिंसाचार करू नये असा संरक्षण आदेश, गैरअर्जदाराने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाकरिता पोटगीदाखल दरमहा रक्कम रू. १५,०००/– द्यावेत असा आदेश, अर्जदाराला नुकसान भरपाई म्हणुन १५,००,०००/– आणि वकीलांची फी म्हणुन रूपये ३०,०००/– दयावेत असा आदेश मिळावा अशी विनंती केली आहे.

३. अर्जदाराने नि.क्र.२२ वर मालमत्ता आणि दायित्वाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तिने सादर केले आहे की, तिला रु. २५,०००/– मानधन मिळते. गैरअर्जदार हा मेकॅनिकल इंजिनिअर असून त्याला दरमहा रूपये ४५,०००/– ते ५०,०००/– पगार मिळतो. तपशीलवार प्रतिज्ञापत्रासह अर्जदाराने अंतरिम देखभालीसाठी प्रार्थना केली.

४. याउलट गैरअर्जदाराने नि.क्र.२० वर त्याचे उत्तर दाखल केले आहे. त्यांनी सर्व प्रतिकूल आरोप फेटाळून लावले. त्याची पत्नी कमावती असून तिला जिल्हा सामान्य रूग्णालय, गडचिरोली येथील नोकरीतुन रु. ४०,०००/– दरमहा पगार मिळतो. अर्जदार घरगुती हिंसाचार कायद्याच्या तरतुदींचा गैरवापर करत आहे. गैरअर्जदाराची आई त्याच्यावर अवलंबुन आहे. त्यामुळे सविस्तर उत्तरासह गैरअर्जदाराने अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

५.		दोन्ही बाजू ऐकल्या. त्यांनी आपापल्या अर्जाच्या व म्हणण्याच्या अनुषंगाने युक्तिवाद केला.

६.		येथे नमूद करणे गरजेचे आहे की, अर्जदार ही सद्यस्थितीत गैरअर्जदारापासून विभक्त राहत असल्याचे दोन्ही पक्षांना मान्य आहे. कुठलीही स्त्री विवाहानंतर स्वेच्छेने विनाकारण पतीचे घर सोडून तिचे माहेरी राहणार नाही. सुरुवातीला हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, घरगुती हिंसाचाराचे आरोप प्रतिज्ञापत्राच्या मदतीने स्थापित केले जातात. अर्जदाराने शपथेवर तिच्या अर्जाच्या कथनांना पुष्टी दिली आहे. अर्जदाराच्या अर्जाचे, कागदपत्रांचे व प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता, अर्जदाराचा गैरअर्जदाराने कौटुंबिक हिंसाचार केला हे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, अर्जदार ही तिचा कौटुंबिक हिंसाचार झाल्यामुळे विभक्त राहत आहे. येथे नमूद करणे गरजेचे आहे की, कौटुंबिक हिंसाचार झाल्याच्या ठोस पुराव्याची या क्षणी गरज नाही. शिवाय, पतीकडून भरणपोषण न करणे हा देखील एक प्रकारचा आर्थिक हिंसाचार आहे. सदर वस्तुस्थिती घरगुती हिंसाचाराच्या कक्षेत येते. अशा प्रकारे, अर्जदाराने प्रथमदर्शनी घरगुती हिंसाचार स्थापित केला आहे.

७.		दोन्ही पक्षांनी दाखल केलेले मत्ता व दायित्वे यांच्या प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे गैरअर्जदार हा मेकॅनिकल इंजिनिअर असून गुजरात येथे नोकरीतुन दरमहा रूपये ४५,०००/– ते ५०,०००/– कमावितो. तसेच अर्जदारही जिल्हा सामान्य रूग्णालयात कंत्राटी तत्तवार नर्स म्हणुन आहे. तिने तिचे माहे एप्रिल ते माहे ऑगस्ट २०२४ दरम्यानचे पगारपत्रक दाखल केले आहे. त्यानुसार तिला दरमहा सरासरी रूपये २०,०००/– देय मानधन आहे. गैरअर्जदाराने त्याच्या मत्ता व दायित्वे यांच्या प्रतिज्ञापत्रात तो दरमहा रूपये २०,०००/– कमावितो असे म्हटले आहे. गैरअर्जदाराने त्याच्या उत्पन्नाचे पगारपत्रक दाखल करण्यास पुरेसा वेळ घेतला परंतु दाखल केला नाही.

८.		एकूण प्राप्त परिस्थीती पाहता गैरअर्जदारावर फक्त अर्जदार अवलबुंन आहे असे स्पष्ट होते. एकूण परिस्थीतीत अर्जदार हिचेकडे उत्पन्नाचे जरी साधन असले तरी ते पर्याप्त आहे असे म्हणता येणार नाही. म्हणुन ती स्वतःचा योग्यप्रकारे उदरनिर्वाह

करण्यास असमर्थ आहे असा निष्कर्ष काढण्यात येतो. तसेच गैरअर्जदाराकडे उत्पन्नाचे साधन असल्याचे स्पष्ट आहे.

९.		अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी आहे ही बाब दोन्ही पक्षास मान्य असुन पती या नात्याने अर्जदार यांचे पालनपोषण करण्याची नैतिक जबाबदारी ही गैरअर्जदाराची आहे. ही जबाबदारी गैरअर्जदार टाळू शकत नाही. येथे नमूद करणे महत्वाचे आहे की, अंतरिम खावटीचा उददेश केवळ प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपावेतो अर्जदारांना आर्थिक सहकार्य करण्याकरिता मदत व्हावी म्हणून असतो.

१०.		अर्जदाराने गैरअर्जदाराला समंस काढावे, त्याच्या विरूध्द खटला भरण्यात यावा, अंतरिम संरक्षण आदेश देण्यात यावा, दरमहा रूपये १५,०००/– अंतरिम खावटी मिळावी, नुकसान भरपाई म्हणुन रूपये १५,००,०००/– देण्याचा आदेश पारित व्हावा, स्त्रीधन व कपडे यांचा ताबा दयावा आणि वकीलांची फी रूपये ३०,०००/– देण्याचा आदेश पारित व्हावा, अशा प्रार्थना केल्या आहेत. गैरअर्जदारास समंस काढलेच आहे. खटल्याबाबतची प्रार्थना या घडीला मान्य करता येणार नाही. गैरअर्जदाराकडून होत असलेल्या कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण मिळण्यासाठी अर्जदाराच्या लाभात अंतरिम संरक्षण आदेश पारित करणे आवश्यक आहे. परंतु सद्यस्थितीत पुरावा नसतांना स्त्रीधन व कपडे यांचा ताबा आणि गैरअजदाराकडून नुकसान भरपाईबाबत आदेश पारित करणे उचित होणार नाही. तसेच वकीलांची फी ही अर्जाच्या खर्चाच्या मथळयाखाली प्रस्तुत मुळ अर्जाचा अंतीम निकाल करतेवेळी विचारात घेता येईल.

११.		सबब, समोर आलेली संपुर्ण परिस्थिती व तथ्ये, सध्याच्या दैनंदिन गरजा, वाढती महागाई, दोघांचेही राहणीमान, दोघांचे उत्पन्न, समोर आलेली कागदपत्रे व इतर खर्च लक्षात घेता व त्याबाबत सारासार विचार करता गैरअर्जदाराने अर्जदाराचे पालनपोषणाकरिता अर्जदाराला दरमहा ₹ ५,०००/– (अक्षरी रूपये पाच हजार मात्र) दिल्यास न्यायोचित होईल. सबब, अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार यांनी अर्जदाराचे पालनपोषणाकरिता अर्जदाराला दरमहा ₹ ५,०००/- (अक्षरी रूपये पाच हजार मात्र) अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून प्रस्तुत मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपावेतो दयावी.

३. गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा किंवा तिला वैवाहिक अडचणीमध्ये मदत करणा-या इसमाचा घरगुती हिंसाचार करण्याबाबत कोणताही प्रयत्न करू नये किंवा कोणालाही तशी मदत करू नये व अर्जदारासोबत कोणत्याही प्रकारे संभाषण करू नये, असा अंतरिम संरक्षण आदेश पारित करण्यात येतो.

४. अर्जदाराच्या अन्य मागण्या नामंजुर करण्यात येतात.

५. सदर आदेशाची विनामुल्य प्रत दोन्ही पक्षांना देण्यात यावी.

६. सदर आदेशाची प्रत संबंधीत संरक्षण अधिकारी व पोलीस ठाणे यांना पाठविण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by CHANDRADIP PRAVINCHANDRA RAGHUVANSHI
Date: 2024.10.22 11:07:03 +0530

गडचिरोली .
दिनांक – २२/१०/२०२४

(चं. प्र. रघुवंशी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
गडचिरोली.